महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २३ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### हवेच्या गुणवता वाढीसाठी ठाणे मनपाचा प्रशंसनीय पुढाकार

ठाणे शहरात वाढत्या बांधकाम प्रकल्पांमुळे हवा प्रदूषणाची पातळी काही भागांत मध्यम प्रदूषित गटात पोहोचली आहे. मात्र नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन ठाणे महापालिकेने हवा प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी गंभीर आणि सातत्यपूर्ण उपाययोजना राबवल्या आहेत. शहरात मिस्ट स्प्रे यंत्रणा बसवणे, तक्रारीसाठी हेल्पलाइन सुरु करणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बांधकामस्थळांवर नोटीस बजावणे आणि दंडात्मक कारवाई करणे ही महापालिकेची जबाबदारी नीट पाळण्यात आली आहे. यामुळे नागरिकांमध्ये शहरातील हवेत सुधारणा होईल या अपेक्षेची भावना निर्माण झाली आहे.

महापालिकेच्या तपासणीत ३३ बांधकामस्थळांमध्ये २८ ठिकाणी नियमांचे उल्लंघन आढळले आणि काहींवर दंडात्मक कारवाई करून एकूण ५ लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही कठोर कारवाई हे दाखवते की महापालिका नियम मोडणाऱ्यांवर तातडीने पावले उचलत आहे आणि शहरातील हवा सुधारण्यास कटिबद्ध आहे. शहरातील वाहतूक वाढ, पायाभूत प्रकल्पांची कामे आणि नागरिकांच्या तातडीच्या गरजा यामुळे काही प्रमाणात प्रदूषण वाढत आहे. तथापि, महापालिकेने या समस्येकडे लक्ष देऊन शहरातील हवा अधिक सुरक्षित करण्यासाठी उपाययोजना सुरु ठेवली आहेत. फेब्रुवारी महिन्यातील AQI सर्वेक्षणानुसार शहरातील हवेचा गुणवत्ता निर्देशांक सरासरी ११५ आहे, आणि काही भागांत १२८ पर्यंत पोहोचला आहे, ज्यामुळे महापालिकेला पुढील नियोजनासाठी दिशा मिळाली आहे. महापालिकेने सतत सुधारणा करत नवीन तंत्रज्ञान वापरणे, नागरिकांशी संवाद ठेवणे आणि नियमांचे पालन सुनिश्चित करणे यावर भर दिला आहे. हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी महापालिकेच्या या प्रयत्नांचे कौतुक करावे लागेल.

काही तथाकथित लोक महापालिकेवर नियम न पाळल्याबाबत टीका करतात, तर काहींचे मत आहे की काही ठिकाणी सुधारणा अपेक्षित प्रमाणात दिसत नाहीत. तरीही, महापालिकेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना दुर्लक्ष करता येणार नाही; शहरातील हवा सुधारण्यासाठी महापालिकेने विविध उपाययोजना राबवल्या आहेत आणि नागरिकांना सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.शेवटी, ठाणे महापालिकेने अशा टीका टीप्पण्यांकडे जास्त लक्ष न देता पुढील काळातही सतत प्रयत्न, प्रभावी नियंत्रण आणि नागरिकांचा सहभाग यांना प्राधान्य देऊन शहरातील हवा प्रदूषण कमी करण्यासाठी कार्यरत राहावे, अशी अपेक्षा आहे.

# आजपासून राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन

**राज्य विधिमंडळाच्या चार आठवड्यांच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनास आज, सोमवारपासून सुरुवात होत आहे. कांदा, धान, सोयाबीन, कापूस आदी प्रश्न गाजण्याची चिन्हे असतानाच मुंबई महापालिका निवडणुकीच्या वेळी केलेली अडवणूक आणि अलिबागमधील जमीन मोजणीच्या वेळी झालेल्या प्रकारावरून विरोधक विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना लक्ष्य करणार आहेत. पुणे घाट तसेच मुलुंडमधील अपघातांवरून सरकारला घेरण्याची तयारी विरोधकांनी केली आहे.**



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**मुंबई :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात होत असून अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत महायुती सरकारने विरोधकांना चर्चेसाठी खुले आमंत्रण देत सर्वसमावेशक भूमिका मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांनी केवळ आरोप करून पळ काढू नये, तर अधिवेशनात सर्व शंका उपस्थित कराव्यात, असे स्पष्ट केले. त्यावर सविस्तर उत्तर देण्यास सरकार तयार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**■ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांची ग्वाही**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत अजितदादांनी पाहिलेलं महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं सांगितलं. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या सर्व घोषणा योग्य वेळी पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाही दिली.

**महाराष्ट्राचं अर्थसंकल्पीय अधिवेशन हे राज्याच्या आर्थिक दिशा ठरवणारं महत्त्वाचं अधिवेशन मानलं जातं. दिवंगत अजितदादांच्या निधनानंतर होणारे हे अर्थसंकल्पीय अधिवेशन असून, दादांच्या आर्थिक शिस्तीचा आणि विकासदृष्टीचा वारसा पुढे नेण्याचं आव्हान महायुती सरकारसमोर आहे. विरोधक-सत्ताधारी यांच्यातील चर्चा, निधीवाटप, योजना आणि विकासाच्या मुद्द्यांमुळे हे अधिवेशन विशेष लक्षवेधी ठरणार आहे.**

**■ अजितदादांच्या कार्याचा गौरव**

या पत्रकार परिषदेत दिवंगत अजितदादांच्या आर्थिक शिस्तीचा आणि दूरदृष्टीचा विशेष उल्लेख करण्यात आला. देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांनी कधीही आर्थिक शिस्त मोडली नाही, उलट राज्याच्या हितासाठी कठोर निर्णय घेतल्याचं नमूद केलं. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या अर्थसंकल्पीय तयारीचा वारसा पुढे नेण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त झाला.

**■ विकास, निधी आणि नवकल्पनांवर भर**

केंद्राकडून महाराष्ट्राला मिळणाऱ्या निधीत लक्षणीय वाढ, कर परतावा, तसेच दावोस येथील गुंतवणूक करारांबाबत अर्थसंकल्पात सविस्तर माहिती दिली जाणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं. शेतकऱ्यांसाठी 'महाविस्तार' एआय ॲपसारख्या नवकल्पनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा मानस सरकारने व्यक्त केला.

**■ विरोधकांवर टीका, पण संवादाचा आग्रह**

विरोधकांकडून प्राप्त झालेल्या पत्रावर भाषेच्या चुका आणि मुद्द्यांच्या पुनरुक्तीबाबत टीका करतानाच, सरकारने चर्चेसाठी दरवाजे खुले असल्याचं पुन्हा अधोरेखित केलं. सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर चर्चा व्हावी, हीच अपेक्षा सरकारची असल्याचं स्पष्ट करण्यात आलं.

राज्य विधिमंडळाचे आज पासून सुरू होणारे हे अधिवेशन २५ मार्चपर्यंत चालणार आहे. पहिल्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणानंतर अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात येणार आहे. त्यावर दिवसभर चर्चा केली जाईल. अजित पवार यांच्या विमान अपघाताचा विषय आमदार रोहित पवार हे उपस्थित करणार आहेत. प्रत्यक्ष कामकाजाला मंगळवारपासून सुरुवात होईल. सत्ताधाऱ्यांचे प्रचंड बहुमत व त्या तुलनेत विरोधकांचे कमी संख्याबळ यामुळे गेल्या वर्षभारातील तिन्ही अधिवेशनांत सत्ताधाऱ्यांचा वरचष्मा राहिला होता.



## सरकार मस्तीत आहे ! - भास्कर जाधवांचं टीकास्त्र

**सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार**

**● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●**

मुंबईतील शिवलाय येथे महाविकास आघाडीची पत्रकार परिषद पार पडली. विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर हि बैठक घेण्यात आली. या बैठकीला कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार, सतेज पाटील, शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, अनिल परब, आणि अमिन पटेल उपस्थित होते. मात्र या बैठकीला शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून एकही नेता उपस्थित राहिलेले नाही. त्यामुळे शरद पवारांचा पक्ष महाविकास आघाडीपासून दूर आहे का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर आम्ही बहिष्कार टाकत आहोत. प्रचंड बहुमत मिळाल्यामुळे सरकार मस्तीत आहे, त्यांना त्याचा माज आहे.मुख्यमंत्र्यांच्या आमंत्रणाला आम्ही जाणार नाही, विरोधकांचा चहापानावर बहिष्कार अशी प्रथा पडलीय असं काहींना वाटेल. मात्र तसं नाहीये. सत्ताधाऱ्यांकडून लोकशाहीचं आणि संविधानाला अनुसरून हवं तसं वागणूक मिळत नाहीये. खरं तर आम्ही सत्ताधाऱ्यांच्या चहा प्यायला जात नसतो तर सरकारी तिजोरीतील पैशातून चहा प्यायला जात असतो. लोकशाही मार्गाने हे सत्ताधारी आणि विरोधी पक्ष हे अंग आहे. मात्र सरकारला मोठ बहुमत मिळाले आहे, त्यामुळे ते विरोधकांचा सन्मान राखत नाही. सत्ताधाऱ्यांच वर्तन समर्थनीय नाही. लोकशाहीला, संविधानाला धरून नाही. म्हणून आम्ही या चहापाण्यावर बहिष्कार टाकत असल्याचे शिवसेना नेते भास्कर जाधव म्हणाले.

# डोंबिवलीतील समर्थ कॉम्पलेक्स अखेर जमीनदोस्त होणार

## उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिकेची हालचाल ■ पोलीस बंदोबस्ताची मागणी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**डोंबिवली :** डोंबिवली आयरेगाव टावरीपाडा परिसरातील समर्थ कॉम्पलेक्स ही बेकायदा इमारत असल्याने **मुंबई उच्च न्यायालय**ने गेल्या दीड वर्षात दोन वेळा ती जमीनदोस्त करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. या आदेशांच्या पार्श्वभूमीवर ही इमारत तोडण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या ग प्रभाग प्रशासनाने जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. इमारत पाडण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणी ग प्रभाग अधिकाऱ्यांनी दोन दिवसांपूर्वी कल्याण परिमंडळाचे पोलीस उपायुक्त यांच्याकडे केली आहे.

आयरेगाव टावरीपाडा येथील (लक्ष्मी व्हिला इमारतीच्या मागे) ही सात मजली बेकायदा इमारत भूमाफिया अक्षय सोलकर यांनी उभारल्याचा आरोप आहे. या प्रकरणी महापालिकेने संबंधित भूमाफियांविरुद्ध एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. एप्रिल २०१९ पासून या इमारतीचे बांधकाम सुरू असताना तत्कालीन ग प्रभाग सहाय्यक आयुक्तांनी केवळ नोटिसा बजावणे व इमारत अनधिकृत घोषित करण्यापुरतीच कारवाई केल्याचे समोर आले आहे. सध्या या बेकायदा इमारतीत सुमारे ६० कुटुंबे वास्तव्यास आहेत. रहिवाशांना दिलासा देण्याबाबतचा दावा न्यायालयाने यापूर्वीच फेटाळून लावला आहे. तत्कालीन सहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी इमारत तोडण्याची प्रक्रिया सुरू केली असता, त्यावेळी रहिवाशांनी तीव्र विरोध केला होता.

**■ घर खरेदीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक**

डोंबिवली परिसरात तब्बल ६५ बेकायदा इमारती उभारणाऱ्या भूमाफियांविरोधात दाखल याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने सर्व इमारती जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले आहेत. या इमारतींना महारेराची प्रमाणपत्रे जोडून त्या अधिकृत असल्याचे भासवून घर खरेदीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच, या बांधकामांदरम्यान पालिकेचा विकास अधिभार व महसूल विभागाची विविध शुल्के बुडवून शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आले आहे. समर्थ कॉम्पलेक्स उभारताना जमिनीच्या मालकी हक्कातून आपले नाव वगळल्याचा आरोप करत वारस बबन केणे यांनीही उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर निर्णय देताना न्यायालयाने ही इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले. आदेश असूनही पालिकेने कारवाई न केल्याने याचिकाकर्ते संदीप पाटील व बबन केणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांविरोधात अवमान याचिका दाखल केल्या आहेत.

## थोडक्यात महत्वाचे

### उल्हासनगर महापालिकेत दरवाढीने पाणी पेटले नागरिकांमध्ये संताप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**उल्हासनगर :** उल्हासनगरमध्ये नागरिकांना पाणी दूषित, अनियमित आणि कमी दाबात मिळत असतानाच महापालिकेने पहिल्याच महासभेत पाणी बिलात मोठ्या प्रमाणात दरवाढ करण्याचा प्रस्ताव मांडला. प्रशासनाने थेट दुप्पट-तिप्पट वाढीचा प्रस्ताव मांडताच सभागृहात संतापाचा उद्रेक झाला. नागरिकांच्या पाण्याच्या समस्येकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करताना सभागृहात उपस्थित सत्ताधारी नगरसेवकांनी अधिकाऱ्यांना प्रश्नांवर धारेवर धरले, तर विरोधक नसतानाही अनेक नगरसेवकांनी वाढीवर तडजोडीचा प्रस्ताव मांडून अंतिम निर्णयासाठी दबाव आणला. अखेर मोठ्या दरवाढीला कात्री लावत मर्यादित वाढीला मंजुरी देण्यात आली, मात्र नागरिकांमध्ये "पाणी समस्या कायम असून बिलात वाढ" याची भावना पसरली आहे.

**■ नगरसेवकांचा विरोध**

दूषित पाणी, अनियमित पुरवठा, फुटलेल्या पाईपलाइन, कमी दाब आणि मोठ्या प्रमाणात पाणी गळती या पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी दरवाढीला विरोध दर्शवला. सुमारे ३०-४० टक्के पाणी गळतीमुळे वाया जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. अनेक नागरिकांना टँकरसाठी तब्बल ७५० रुपये मोजावे लागत असल्याचेही नमूद करण्यात आले. काही घरांना दोन पाणीबिले येत असल्याचा, तर पडलेल्या इमारतींवरही कर आकारणी सुरू असल्याचा मुद्दा उपस्थित झाला. पाणीपुरवठा विभागातील अधिकारी-कर्मचारी बेशिस्त असून नागरिकांचे फोनही उचलत नसल्याचा आरोप ७८ पैकी अर्ध्याहून अधिक नगरसेवकांनी केला.

**■ तडजोडीचा निर्णय**

"पहिले पाणीपुरवठा समस्या सोडवा, नंतरच दरवाढ करा" अशी मागणी काही नगरसेवकांनी केली, मात्र अखेर तडजोडीचा प्रस्ताव मंजूर करून पाणी दरवाढ लागू करण्यात आली.

# धर्मवीर आनंद दिघे प्रवेशद्वाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर

## प्रवेशद्वाराचे काम पूर्ण करणार का? केदार दिघेंचा सत्ताधाऱ्यांना सवाल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) पक्षाने बहुमताने सत्ता काबीज केली असली, तरी शहराच्या अस्मितेशी जोडल्या गेलेल्या कामांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विरोधकांकडून होऊ लागला आहे. ठाणे-मुलुंडच्या वेशीवर पूर्वी असलेल्या स्वर्गीय धर्मवीर आनंद दिघे साहेब प्रवेशद्वाराच्या पुनर्बांधणीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून शिवसेना (ठाकरे गट) चे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी सत्ताधाऱ्यांवर थेट टीका केली आहे.

●●●



ठाणे व मुंबईच्या वेशीवर असलेल्या आनंद नगर जकात नाका येथे अनेक वर्षांपूर्वी उभारलेली ही कमान महापालिका प्रशासनाने कामानिमित्त काढून टाकली होती. त्या वेळी नव्याने भव्य कमान उभारण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, कमान काढून अनेक वर्षे उलटून गेली तरी अद्याप त्या ठिकाणी प्रवेशद्वार उभारण्यात आलेले नाही. केदार दिघे यांनी यापूर्वीही या विषयावर आवाज उठविला असून, आता सत्ताधारी बहुमताने निवडून आल्यावर तरी हे काम पूर्ण होईल का, असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. महापालिकेत सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक असूनही आणि महासभा नियमित सुरू असतानाही शहराच्या अस्मितेशी निगडित कामे रखडत असल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली.

**• सत्ताधाऱ्यांच्या इच्छाशक्तीवर प्रश्नचिन्ह**

मागील अनेक वर्षांपासून ठाणेकर नागरिक या प्रवेशद्वाराच्या पुनर्बांधणीची मागणी करत आहेत. पूर्वीच्या प्रवेशद्वारापेक्षा अधिक भव्य व देखणे प्रवेशद्वार उभारावे, अशी लोकभावना आहे. मात्र, सत्ताधारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत असून, आता तरी धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या नावाचे भव्य प्रवेशद्वार उभारण्यास सुरुवात होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



## वाचक मनोगत

### कर्मयोगी संत गाडगे महाराज

हाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १५० वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# वर्षअखेरीस कर वसुलीसाठी महापालिकेची विशेष मोहीम

## फेब्रुवारी मध्यांनाअखेर 51% मालमत्ता कराची वसुली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

- **मालमत्ता कर वसुली वाढविण्यासाठी महापालिकेची कडक पावले**
- **कर वसुलीसाठी प्रत्येक प्रभागात स्वतंत्र पथके**

**कल्याण :** कल्याण–डोंबिवली महापालिकेच्या कर विभागाकडे आर्थिक वर्षात आतापर्यंत मालमत्ता कराची वसुली अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे चित्र समोर आले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या मध्यापर्यंत केवळ ५१ टक्के मालमत्ता कर वसूल झाला असून, गत अकरा महिन्यांत सुमारे ३६२ कोटी रुपये करभरणा झाला आहे.

महापालिकेचा २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर वसुलीचा इष्टांक ६०० कोटी रुपये इतका निश्चित करण्यात आला होता. मात्र सुरुवातीच्या आठ महिन्यांत केवळ २६४ कोटी रुपये जमा झाले होते. उर्वरित तीन महिन्यांत फक्त ९८ कोटी रुपये वसूल झाल्याने वसुलीचा वेग मंदावल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, थकबाकीदारांना दिल्या जाणाऱ्या ‘अभय योजना’चा लाभ देण्याबाबत कर संकलन उपायुक्त बाळासाहेब चव्हाण यांनी स्पष्टपणे नकार दिला आहे. त्यामुळे थकबाकी वसुलीबाबत महापालिकेची भूमिका कठोर राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

वर्ष संपण्यास उरलेल्या अवघ्या ३४ दिवसांत सुमारे २८३ कोटी रुपयांची वसुली करणे महापालिका प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी प्रत्येक प्रभागात स्वतंत्र वसुली पथकांची स्थापना केली असून, जप्तीच्या कारवाया सुरू करण्यात आल्या आहेत. मात्र जप्त करण्यात आलेल्या काही मालमत्तांबाबत ठोस निर्णय न झाल्याने त्या मालमत्ता प्रत्यक्षात मालमत्ता धारकांच्या ताब्यातच राहत असल्याची चर्चा आहे.

महापालिकेच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार, २३६ कोटी रुपयांच्या थकबाकीसह एकूण ६०० कोटींच्या वसुलीचा आढावा देण्यात आला असून, त्यापैकी ७९ कोटी थकबाकी तर २६८ कोटी चालू मालमत्ता कर वसूल झाल्याची नोंद आहे. यावरून एकूण वसुली ५३ टक्के असल्याचे दाखविण्यात आले आहे.

मालमत्ता करासह पाणीपट्टी विभागाचीही परिस्थिती समाधानकारक नाही. पाणीपट्टी विभागाकडे १९६ कोटी रुपयांची मागणी असताना केवळ ४५ कोटी रुपयांची वसुली झाली असून, हे प्रमाण अवघे २५ टक्के आहे. तसेच नगर विकास विभागाची वसुली २९ टक्के, तर परवाना विभागाची वसुली केवळ १६ टक्के इतकीच असल्याने प्रशासनाकडून संबंधित विभागांना वसुली वाढविण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आल्याचे समजते.

एकूणच आर्थिक वर्षाच्या अखेरीस उद्दिष्टपूर्ती साध्य करण्यासाठी महापालिका प्रशासनास कठोर उपाययोजना कराव्या लागणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# उपलोकायुक्तांकडून मोटार वाहन निरीक्षकांसह टंकलेखकांवर वेतन रोखण्याची कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी ● शरद भसाळे**

प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे व नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयतील काही कर्मचारी व अधिकारी गलथान कारभार करत असल्याने राज्य शासनाने वारंवार कारवाई करून सुद्धा येथील गलथान व भ्रष्ट कारभार सुरूच असुन येथील काही अधिकारी कर्मचारी यांनी एकूण ८५० वाहनांच्या प्रकरणात ४.० या संगणक प्रणालीवर जुन्या वाहनांची एन्ट्री घेताना सीबीआर नोंदी अद्यावत न करता टॅक्स क्लिअरन्स अप्रुवल बिले मंजूर केले त्यामुळे शासकीय महसूलीचे मोठे नुकसान झाल्याचा गंभीर प्रकार चौकशी तपासणीत उघड झाल्याचे शासन अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्याने त्यांनी मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला आणि लिपिक टंकलेखक मयूर हटकर व सुहास पवार यांचेवर वेतन रोखण्याची कारवाई केली आहे.हा प्रकार राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी केलेल्या तक्रारीनंतर झालेल्या चौकशीनिहाय अहवालामुळे उघड झाला.त्यामुळे परिवहन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यां मध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत सुत्रांनी दिलेली माहिती अशी कि परिवहन कार्यालयात जुन्या वाहनांची बॅकलॉग एन्ट्री, टॅक्स क्लिअरन्स व्हेरिफिकेशन व अप्रुव्हल देऊन शासकीय महसुलाची हानी - नुकसान केले जात असे लेखी तक्रार निवेदन राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे शरद धुमाळ यांनी परिवहन विभाग व उपलोकायुक्त कार्यालयाकडे दिली होती.त्यामुळे तक्रारी सखोल चौकशी करण्यात आली मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला तसेच लिपिक टंकलेखक मयूर हटकर आणि सुहास पवार हे कसुरीग्रस्त आढळून आल्याने त्यांच्यावर पुढील १ वर्षाकरिता वेतन वाढ रोखण्याची कारवाई - शिक्षा लादण्यात आली असल्याची माहिती धुमाळ यांनी दिली. शासनाकडून झालेल्या धडक कारवाई मुळे परिवहन विभागातील कर्मचाऱ्यां मध्ये खळबळ माजली आहे.

# कबड्डी महाराष्ट्राचा श्वास तर रायगड जिल्हा कबड्डीपटूंची खाण - आमदार प्रशांत ठाकूर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ पेण / प्रतिनिधी**

कबड्डी महाराष्ट्राचा श्वास तर रायगड जिल्हा कबड्डीपटूंची खाण - आमदार प्रशांत ठाकूर पेण (प्रतिनिधी)महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली कबड्डी महाराष्ट्राचा श्वास असून रायगड जिल्हा कबड्डीपटूंची खाण आहे, असे प्रतिपादन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज उलवेनोड येथे केले. गोरगरिबांचे आधारस्तंभ दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष निमित्ताने रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवेनोड मधील रामशेठ ठाकूर मैदानावर दिनांक २० ते २२ फेब्रुवारीपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय प्रौढ महिला आणि पुरुष गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी २०२६ स्पर्धेचा उदघाटन सोहळा आज (दि. २०) लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रमुख संयोजक म्हणून ते बोलत होते.

उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल जवळील मैदानावर सुरु झालेल्या या स्पर्धेच्या उदघाटन सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ऍड. आस्वाद पाटील, पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, मंडळाचे सचिव परेश ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पर्धा संयोजन समितीचे सचिव शरद कदम, श्री. शिव छत्रपती पुरस्कार विजेते प्रमोद म्हात्रे, श्री. शिव छत्रपती पुरस्कार विजेते सुर्यकांत ठाकूर, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे माजी सहकार्यवाह जे. जे. पाटील, यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर तसेच कबड्डीप्रेमी मोठ्या संख्यने उपस्थित होते. या स्पर्धेच्या प्रारंभाला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री प्रतिमांचे पूजन झाले. त्यानंतर लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते क्रीडाध्वजाचे रोहण करण्यात झाले तर आमदार महेश बालदी यांच्या हस्ते क्रीडाज्योती प्रज्वलित करून स्पर्धेचे उदघाटन झाले. यावेळी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आगामी राज्यस्तरीय स्पर्धेच्या धर्तीवर जिल्ह्याचा संघ निवड करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १२८ पुरुष कबड्डी संघ आणि ३२ महिला संघ सहभागी झाले आहेत. यातून निवड झालेल्या खेळाडूंचा संघ महाराष्ट्र राज्य कबड्डी संघाच्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये रायगडचे प्रतिनिधित्व करणार आहे. या स्पर्धेच्या अनुषंगाने जवळपास १०० पंच कार्यरत असून सुसज्ज अशी चार क्रीडांगणे, मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, नाश्ता, भोजन, तसेच इतर पूरक सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.





**महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली कबड्डी हा महाराष्ट्राचा श्वास असून रायगड जिल्हा कबड्डीपटूंची खाण आहे, असे प्रतिपादन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष प्रशांत ठाकूर यांनी केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवस वर्षानिमित्त उलवेनोड येथे आयोजित रायगड जिल्हास्तरीय महिला व पुरुष गट कबड्डी अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.**

# शहापाडा धरण आटले ● पाहणी दौरा ; की जनतेची दिशाभूल. - सी.आर.म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण(प्रतिनिधी)**

बुधवार दि. 18/02/2026रोजी न भूतो न भविष्यती असा धोंडबा आंदोलन झाले, प्रसार माध्यमांनी प्रशासन,आणि लोकप्रतिनिधी यांना या आंदोलनाची दखल घ्यावी लागली,थोडी का होईना तारांबळ उडाली म्हणायला हरकत नाही. ज्यावेळी सात दिवसातून एकदा पाणी मिळेल ,या नोटीसीची होळी करण्यात आली,तेव्हा संयम संपला हे नक्की त्यावेळी असे घडू शकते ,प्रशासनाचे दुय्यम दर्जाचे अधिकारी ,ज्यांस कागदोपत्री उत्तरे देता येतात पण प्रॅक्टिकली शून्य रिझल्ट...धरण आटले ,एकदम साक्षात्कार झाला का? .दुसरे NGP चे अधिकारी प्रयत्न करतो,एखादी नवीन मोटारीची व्यवस्था करतो,मग इतक्या दिवस का सुस्त बसले?,की जाणूनबुजून असे करण्यास कोणी भाग पाडले. आपण ज्या खुर्चीत बसतो त्या खुर्चीला न्याय दिला पाहिजे. जर आम्ही अदृश्य शक्तीला जसे घाबरतो तसे जनतेला पण घाबरा.. आपल्या लाडक्या बहिणी पाण्याची चातक पक्षासारखी वाट पाहतात. त्यांचे1500 बंद करण्याची हवा यावेळी येते म्हणून त्या थोड्या गप्प दिसतात,पण त्या पण हंड्या सोबत पुढच्या वेळी लाटणे घेतील हे तितकेच खरे. अशी रोखठोक प्रतिक्रिया पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी दिली. सात दिवसातून पाण्याचे नियोजन हा निर्णय कोणी,कधी,कोणाच्या सांगण्यावरून घेतला हे स्पष्ट झाले पाहिजे.आपल्या घरात एक दिवस पाणी नसेल तर काय अवस्था होते,सात दिवसातून पाणी आले तर,शाळांमध्ये स्वच्छता राहील का? सार्वजनिक ठिकाणी पाण्याअभावी बट्ट्याबोळ होईल.कृत्रिम पाणी टंचाई,पुन्हा कालव्यातून पाणी,मानवी विष्ठा,गुरेढोरे मेलेले अवशेष,गटाराच्या सांडपाण्याची आत्महत्या याच कालव्यात होते. तेच पाणी दिले तर साथीच्या आजाराचा उद्रेक होईल.अगोदरच या पाण्याने काविळीचे बळी गेलेत, त्याचीच पुनरावृत्ती करायची आहे का प्रशासनाला.लोक आपला मोर्चा शासन दरबारी न आणता वेगळ्या ठिकाणी नेतील हे ही तितकेच खरे असल्याचे सांगितले. खारेपाट विकास संकल्प संघटने कडून वेळोवेळी सर्वांना सोबत घेऊन आंदोलने यशस्वी केलीत,पुन्हा आगळा वेगळा आंदोलन करण्यास भाग पाडू नये.

आमचे लोकप्रतिनिधी आंदोलन घेण्या अगोदर लोकांना भेटून समस्या निवारण करू शकत होते,पण एवढ्या लोकांना वेठीस का धरता.एव्हढे उग्र आंदोलन का केले जाते. याची माहिती असताना या ठिकाणी भेट देणे अपेक्षित असते, आपलेच मतदार,अपेक्षा असते त्यांना पण...?लोकप्रतिनिधींनी लोकांच्या अपेक्षा पूर्ण करायला पाहिजे,आज किती निवडणुका झाल्या, पण पाणी प्रश्न जैसे थे.. धरणाची अवस्था अधिकाऱ्यांनी पाहिली नसेल म्हणूनच काय धरणातील पाण्याची पातळी मोजण्याची,पाहण्याची वेळ अधिकाऱ्यांनी नेत्यांवर असणं ठेवली, असेच म्हणावे लागेल. आज धोंड्या, देव यांच्याकडे मरण दे,,अशी मागणी असणे म्हणजे प्रश्न तोच उत्तर पण तेच म्हणून मरण मागावं लागत,हे फार वाईट.अशी खंतही व्यक्त केली. आंदोलन होऊन धावाधाव होण्यापेक्षा आंदोलन होऊ नये याची काळजी संबंधित यंत्रणेने घेतली पाहिजे..यापुढे आंदोलन शासन दरबारी होईल अशी शक्यता नाही कारण न्यायाची अपेक्षा शून्य असे सुतोवाच केले. या खारेपाट विकास संकल्प संघटनेचे आंदोलन,श्रद्धांजली,गाढवाचे लग्न, धरणात जाण्याचा प्रयत्न,आत्ता धोंड्या देव आंदोलन,यापुढे कदाचित वेगळीच संकल्पना असेल. असेही सांगितले.

### अखिल देशस्थ दैवज्ञ समाज आणि श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर संस्थेतर्फे

# भाजप नगरसेविका हेमलता पवार यांच्यासह माजी आमदार नरेंद्र पवार यांचा सत्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नुकत्याच झालेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भरघोस मतांनी निवडून आल्याबद्दल कल्याणातील अग्रमानांकित अखिल देशस्थ दैवज्ञ समाज आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थेच्या संयुक्त विद्यमाने नवनिर्वाचित भाजप नगरसेविका हेमलता पवार यांचा सत्कार करण्यात आला. तसेच भाजप नेते आणि कल्याण पश्चिमचे माजी आमदार नरेंद्र पवार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. अखिल देशस्थ दैवज्ञ समाज आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत बेलेकर, नंदकुमार काकटकर, दामोदर खोलम, मुकुंद निघोळकर यांच्यासह दोन्ही संस्थांचे पदाधिकारी - सदस्य आणि अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.




कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच्या उमेदवार हेमलता पवार या कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक ७ मधून भरघोस मतांनी विजयी झाल्या आहेत. निवडून आल्याच्या पहिल्या दिवसापासून त्यांनी प्रभागांमध्ये कामाचा सपाटा लावला असून अनेक नागरी समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्याची दखल घेत अखिल देशस्थ दैवज्ञ समाज आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थेकडून या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नगरसेवकपदी निवडून आल्यानंतर प्रतिष्ठित सामाजिक संस्थांकडून होणारा हा आपला पहिलाच सत्कार सोहळा असल्याचे सांगत नगरसेविका हेमलता पवार यांनी दोन्ही संस्थांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच या सत्कारामुळे आपल्याला काम करण्यासाठी आणखी ऊर्जा मिळाली असून येणाऱ्या काळात आपण आपल्या सामाजिक कामाचा आलेख असाच उंचावत ठेवू असा विश्वासही त्यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केला. तर यावेळी भाजप नेते आणि कल्याण पश्चिमेचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनाही यावेळी दोन्ही संस्थांकडून गौरवण्यात आले. कल्याण पश्चिमेतील लोकांना आपल्या कामाची पद्धत माहिती असून प्रभागासोबतच शहराच्या विकासासाठी आम्ही दोघेही यापुढे असेच समर्पक वृत्तीने कार्य करू अशी भावना यावेळी नरेंद्र पवार यांनी व्यक्त केली.

## भविष्यवेध



**■ सोमवार**
**23 फेब्रुवारी 2026**

**मेष**
आज तुम्ही एखाद्या धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहाल आणि यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. दिवस तुमच्यासाठी मिश्रित असेल.

**वृषभ**
कामावर तुम्ही चांगले काम कराल आणि तुमच्या सहकाऱ्यांकडून पूर्ण सहकार्य मिळेल. बांधकामाच्या कामात तुम्ही एखाद्या अनुभवीचा सल्ला घेऊ शकता.

**मिथुन**
जर तुम्ही आज काहीतरी नवीन सुरू करण्याचा विचार करत असाल तर हा एक शुभ दिवस आहे. दिवस तुमच्यासाठी चांगला राहणार आहे.

**कर्क**
उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील आणि तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. ऑफिसमध्ये थोडे जास्त काम असेल, शारीरिक थकवा येऊ शकतो.

**सिंह**
जेव्हा तुम्ही तुमच्या चिंता वरिष्ठ अधिकाऱ्यासमोर मांडाल तेव्हा तुम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल. तुमचे काम सोपे आणि सुरळीत होईल.

**कन्या**
पालकांकडून तुम्हाला आर्थिक मदत मिळेल. दिवस तुमच्यासाठी चांगला राहणार आहे. तुम्ही व्यवसायाच्या बाबींवर लक्ष केंद्रित कराल कुटुंबातील

**तुळ**
एखाद्या सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी ऐकू येईल.वडिलांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. मोठ्यांचा सल्ला घ्या, तुम्हाला चांगला सल्ला मिळेल.

**वृश्चिक**
भावनेच्या भरात आज कोणालाही वचन देऊ नका. आज फालतू खर्चापासून दूर राहून बजेट सांभाळा. नवीन काम सुरू करण्यासाठी योग्य वेळेची वाट पहा.

**धनु**
तुमच्यासाठी व्यस्त असेल. व्यवसायात नफा मिळविण्याची संधी असेल. दिवस चांगला जाणार. उत्तम रोजगाराच्या संधी आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील

**मकर**
ज्यामुळे आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. जोडीदाराकडून प्रकल्पाच्या कामात पाठिंबा मिळेल, जो तुमच्या भविष्यातील यशासाठी उपयुक्त ठरेल.

**कुंभ**
दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. सहकाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले तर भविष्यात ते तुम्हाला महत्त्वपूर्ण फायदे देतील. खर्चावर नियंत्रण ठेवणे

**मिन**
आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. दिवस तुमच्यासाठी व्यस्त असेल. व्यवसायात नफा मिळविण्याची संधी असेल. आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.



# राहुल गांधींविरोधात युवासेना आक्रमक पोस्टाद्वारे पाठवल्या बांगड्या




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ प्रतिनिधी**

**ठाणे** - दिल्ली येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय एआय समिट दरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनाच्या निषेधार्थ ठाण्यातील राम मारूती परिसरात युवासेनेचे आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी स्पीड पोस्टद्वारे बांगड्या पाठवण्यात आलेल्या आहेत. याची अधिकृत पावतीही शिवसेनेकडे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. दिल्ली येथे सुरु असलेल्या एआय समिट दरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी केलेले चड्डी बनियान आंदोलन, राहूल गांधी वारंवार करत असलेली देशविरोधी विधाने, संसदेचे कामकाज चालू न देणे अशा या सर्व गोष्टींचा निषेध आज टेंभी नाका येथील आनंद आश्रम येथे खासदार नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. त्यानंतर शहरातील राम मारूती रोड परिसरात शिवसेनेचे प्रवक्ते राहुल लोंढे यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यातील राम मारुती रोड परिसरामध्ये राहुल गांधी यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी युवा सेनेचे कार्यकर्ते फलक हातात घेऊन सहभागी झाले होते. यामध्ये "रागा -देशवासियांची माफी मागा", "काँग्रेसी चड्डी बनियन काय समजेल एआय ग्यान" नसेल बुद्धी तर एआय वापरा काँग्रेसच्या चड्डी बनियन गँगला आवरा अशा आशयाचे फलक हाती घेण्यात आले होते.

या आंदोलनाच्या माध्यमातून शिवसेनेच्या वतीने राहुल गांधी यांना प्रतीकात्मक स्वरूपात बांगड्य पाठवण्यात आल्या. राहुल गांधी दिल्लीतील येथील निवासस्थानी उपस्थित नसल्याने या बांगड्या स्पीड पोस्टद्वारे पाठवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. याची अधिकृत ८९१ रूपयांची पावतीही शिवसेनेकडे उपलब्ध असल्याचे लोंढे यांनी सांगितले. तसेच कपडे काढून आंदोलन करण्यापेक्षा लोकशाही मार्गाने लढा द्यावा. लोकसभेत आणि विधानसभेत जनतेने काँग्रेसला आधीच उत्तर दिले आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

# कल्याण : रंगीला बारवर मध्यरात्री पोलिसांचा छापा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. २२**

**कल्याण :** कल्याण–डोंबिवली पोलिसांच्या विशेष पथकाने शुक्रवारी मध्यरात्री रंगीला बार येथे छापा टाकून तोकडे कपडे परिधान करून ग्राहकांसमोर अश्लिल नृत्य सादर करणाऱ्या २३ तरुणींना अटक केली. याच कारवाईदरम्यान कल्याण रेल्वे स्थानक परिसरातील गल्लीबोळात वेश्या व्यवसाय करणाऱ्या १० वारांगना व ४ मध्यस्थांनाही अटक करण्यात आली. या सर्वांविरोधात मानपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

रंगीला बार रात्री उशिरापर्यंत सुरू असून तेथे महिला सेविका तोकडे कपडे परिधान करून वाद्यवृंदाच्या तालावर अश्लिल नृत्य करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे महाराष्ट्र पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशानुसार डोंबिवली विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक के. आर. पाटील व त्यांच्या पथकाने ही धडक कारवाई केली.

छाप्याच्या वेळी बारमधील ग्राहक व नृत्य करणाऱ्या तरुणींमध्ये एकच गोंधळ उडाला. वाद्यवृंदाच्या गाण्यांच्या तालावर नृत्य सुरू असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. कारवाईनंतर संबंधित ठिकाणांची झडती घेऊन पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

**■ अनैतिक व्यवसायांच्या विरोधात कठोर पावले**

शहरात अश्लिल नृत्य व वेश्या व्यवसायाला आळा घालण्यासाठी अशीच धडक कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. २२**

**ठाणे :** ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे स्वातंत्र्यवीर सेवा प्रतिष्ठानच्या वतीने 'सूर आणि ताल' या अनोख्या आनंदोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त हा सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. या कार्यक्रमात कलाक्षेत्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यंदाचा धर्मवीर आनंद दिघे जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते जितेंद्र यांना राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर ज्येष्ठ पत्रकार अंबरिश मिश्र यांनी घेतलेल्या मुलाखतीत जितेंद्र यांनी आपल्या दीर्घ चित्रपट कारकिर्दीतील अनुभव, आठवणी आणि रसिकांशी असलेले नाते उलगडले. कार्यक्रमाला सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.



# नगराध्यक्ष संतोष चौधरी यांच्या विरोधात बहूमत चाचणी!

## मुरबाड नगरपंचायतवर पून्हा भाजपाचा झेंडा फडकणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड ■ दिलीप पवार**

मुरबाड नगरपंचायत मध्ये नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपतील सात व दोन अपक्ष अशा नऊ नगरसेवकांनी परिवर्तन पॅनलची स्थापना करून आमदार किसन कथोरे पर्यायी भाजपला शह दिला होता. यानंतर या परिवर्तन पॅनल ने खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा), माजी खासदार कपिल पाटील, वन मंत्री गणेश नाईक यांच्या भेटी घेऊन आमदार किसन कथोरे यांना शह देण्याचा प्रयत्न करत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करून मुरबाड नगरपंचायत मध्ये शिवसेनेचा झेंडा फडकवला मात्र राज्यात भाजपचे प्राबल्य पाहून व विकासाच्या नावाने शिंदे सेनेत गेलेल्या पाच नगरसेवकांनी पुन्हा स्वगृही जाण्याचे निश्चित केल्याने व नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांच्यावर अविश्वास ठराव मंजूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन शिंदे सेनेत गेलेले पाच व शिवसेनेच्या दुसऱ्या गटातील पाच नगरसेवकांनी भाजपात जाण्याच्या निर्णयाने आमदार किसन कथोरे यांनी आपले वर्चस्व पुन्हा सिद्ध करून ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांना शह दिला आहे.

परिवर्तन पॅनल मधून सेनेत गेलेले पाच व शिंदे सेनेतील पाच नगरसेवक मागील पाच ते सहा सहा दिवसापासून नॉट रिचेबल होते त्यामुळे अविश्वास ठराव मंजूर होई पर्यंत हे नगरसेवक कुठे गायब झाले अशी चर्चा सुरू असताना परिवर्तन पॅनल मधून शिंदे यांच्या गटात गेलेले रविना विनायक राव, उर्मिला सुजित ठाकरे, स्नेहा सागर चंबावणे, गटनेता मोहन गडगे व नम्रता नंदकुमार जाधव यांच्यासह शिंदे सेनेचे गटनेते नितीन तेलवणे, नम्रता तेलवणे व विनोद नार्वेकर, अक्षय रोठे,मोनिका शेळके हे नगरसेवक व नगरसेविका नॉट रिचेबल असताना या सर्व नगरसेवकांचे आमदार किसन कथोरे यांच्या सोबत एकत्रित फोटो व्हायरल झाल्याने या नॉट रिचेबल नगरसेवकांचा पत्ता लागला असल्याची चर्चा असून आमदार किसन कथोरे यांच्या विकासाच्या मार्गावर जाण्यासाठी आम्ही पुन्हा एकदा स्वगृही जाण्याचे निश्चित केल्याचे यातील नगरसेवकांनी सांगितले. त्यामुळे पुन्हा नगरपंचायतीवर भाजपची एकहाती सत्ता स्थापन होऊ शकते अशी राजकीय खेळी आमदार कथोरे यांनी खेळली असून माजी नगराध्यक्ष रामभाऊ दुधाळे, नगराध्यक्ष संतोष चौधरी उपनगराध्यक्षा दीक्षिता वारघडे व नगरसेविका अनिता मार्के यांना पुढील राजकीय खेळीला सामोरे जावे लागणार आहे.

दरम्यान जिल्हाधिकारी ठाणे यांच्या आदेशानुसार येत्या २६ तारखेला स.११ वाजता कल्याणचे उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन केले गेले असून यावेळी विद्यमान नगराध्यक्ष यांच्यावर अविश्वास ठराव म्हणजेच बहुमत चाचणीला सामोरे जावे लागणार आहे, याकडे समस्त मुरबाड करांचे लक्ष लागले आहे.

# बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने मान्यवरांना गहिवर

## सुहित जीवन ट्रस्टच्या बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण ● प्रतिनिधी**










सुहित जीवन ट्रस्ट या बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांचा 21 वा वार्षिक स्नेहसंमेलन आज उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाले. बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने मान्यवर गहिवरून गेले. बौद्धिक अक्षम असताना देखील मुलांच्या उपजत असणारी कला पाहताना प्रेक्षकांना आसू आवरता आले नाही. कलेचे उपजत गुण असणारी बालके नृत्याविष्कार करताना मन भरून आले.आपले मूल सादरीकरण करताना अक्षरशः शिक्षक पालक व मान्यवरांच्या अंगावर काटा उभा राहिला होता. त्यांच्यातील भावविश्व,कलेची दाखवलेली चुणूक, आत्मियता ,सादरीकरणाची कृती अतिशय वाखाणण्याजोगी होती. सुहित जीवन ट्रस्टच्या 21 व्या वार्षिक स्नेहासंमेलनाला आलेल्या मान्यवरांमध्ये वैभवराजे घाटगे (सहसचिव मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य) धनंजय मेहता, (संस्थापक - अवर चिल्ड्रेन संस्था, मुंबई ) प्रितम पाटील(नगराध्यक्षा, पेण.) डॉ. सचिन जाधव (विशेष कार्याधिकारी शिवेंद्रराजे भोसले) श्री. वाघरकर सर (डायरेक्टर - ऊर्जा विभाग) मंगेश पाटील (रायगड जिल्हा दिव्यांग सक्षमीकारण अधिकारी, अलिबाग)साईनाथ पवार (सहाय्यक सल्लागार, राजिप दिव्यांग विभाग ) डॉ. आनंद गोसावी (मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल तालुका) चित्तरंजन गोहोकर व परिवार (मालक सुप्रसिद्ध संतोषम हॉटेल चैन्स, मुंबई ) तसेच डॉ. सुरेखा पाटील (संस्थापिका व अध्यक्षा) वरुण पाटील (सचिव) मंगलदास ठाकूर (खजिनदार) निशांत नाईकडे (विश्वस्त)आधी मान्यवर उपस्थित होते.उपस्थितांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

अध्यक्षा सुरेखा पाटील यांचे अथक परिश्रम आणि प्रयत्न तसेच शिक्षकांच्या मेहनतीने विविध उपक्रमांनी सजवलेल्या कार्यक्रमात अक्षम ते सक्षम या 21 वर्षाच्या कार्यकाळात चार तालुक्यातील ५८ गावातील अनेक विद्यार्थी या बौद्धिक अक्षम शाळेत शिकत असून आजपर्यंत विशेष शिक्षणाच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण व्यवसाय शिक्षण देऊन विद्यार्थ्याला सक्षम कसं करता येईल तो भविष्याच्या दृष्टीने आत्मनिर्भर कसा होईल यासाठी या संस्थेने उचललेले पाऊल अतिशय स्तुत्य आणि वाखाणण्याजोगेआहे. संस्थेचे कार्य निश्चितच अभिमानास्पद असून

सर्वांचे कौतुक करावे तेवढे कमी असे मार्गदर्शन वैभवराजे घाडगे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले. अनेक मान्यवरांनी यावेळी संस्थेला पालकांना व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते संस्थेसाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षक पालक विद्यार्थी तसेच पत्रकार यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ तसेच सन्मानचिन्हे देऊन विशेष गौरव करण्यात आला.

# भिवंडी गुन्हे शाखेकडून दोन सराईत आरोपींना अटक

## सात लाखाचा मुद्दे माल हस्तगत सहा गुन्ह्यांची उकल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी ( प्रतिनिधी )**

**भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या विशेष पोलीस पथकाने शहरात घरफोडी व वाहन चोरी करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगार आरोपींना मोठ्या शिताफीने तपास करीत ताब्यात घेऊन अटक केली आहे. अधिक चौकशीतून सहा गुन्ह्यांची उकल करीत त्याच्या जवळून सुमारे सात लाख ३९ हजार ४०० रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आजाद सिंग उर्फ धनरी मधुसिंग टाक (वय ३३ वर्षे) व अजय सिंग उर्फ मामू भूरासिंग दुधानी (वय २८ वर्षे,दोघे रा.दिडोली, सुरत,राज्य गुजरात) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. ठाणे पोलीस आयुक्तालयात घरफोडी चोरीच्या होणाऱ्या घटनांना आळा घालण्याचे आदेश ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी दिले असुन दिलेल्या सूचनांनुसार उपाययोजना सुरू असतानाच सदरचे गुन्हे उघड करण्यात भिवंडी गुन्हे शाखेचा पोलिस पथकास यश मिळाले आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शीतल राऊत यांच्या पोलिस पथकास मिळालेल्या माहिती वरून त्यांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे संशयित आरोपींची माहिती घेऊन गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराज माळी,मिथुन भोईर, उपनिरीक्षक रविंद्र पाटील,राजेश शिंदे,रामचंद्र जाधव,सुधाकर चौधरी, सुनिल साळुंखे,निलेश बोरसे,प्रशांत राणे,प्रकाश पाटील,सुदेश घाग,शशिकांत यादव,साविर शेख,राजेश गावडे,वसंत चौरे, रंगनाथ पाटील,वामन भोईर,किशोर थोरात, योगेश कवडे,अमोल इंगळे,सर्फराज तडवी, विजय कुंभार,भावेश घरत,रविंद्र साळुंखे व माया डोंगरे,अनुष्का पाटील,दक्षता सुतार, सायली गंभेरा या पोलीस पथकाने परिसरात सापळा रचून आजाद सिंग उर्फ धनरी मधुसिंग टाक व अजय सिंग उर्फ मामू भूरासिंग दुधानी यांना ताब्यात घेत चौकशी करून नारपोली पोलीस ठाण्यातील चार तर कोनगाव व विरार पोलिस ठाण्यातील प्रत्येकी एक अशा सहा घरफोडी व वाहन चोरीच्या गुन्ह्यांची उकल केली आहे. त्याच्या जवळून सुमारे सात लाख ३९ हजार ४०० रुपये किमतीचे सोने चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# नवी मुंबईतील निम्म्याहून अधिक मालमत्ता धारकांकडून कर थकीत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ बातमीदार**

**नवी मुंबई :** महापालिका निवडणुकांनंतर पार पडलेल्या नवी मुंबई महानगरपालिकाच्या पहिल्या महासभेत मालमत्ता करासंदर्भात समोर आलेली माहिती धक्कादायक आणि नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी चिंताजनक ठरणारी आहे. शहरातील एकूण मालमत्ताधारकांपैकी निम्म्याहून अधिकांनी मालमत्ता कर भरलेला नसल्याची माहिती आयुक्तांनी सभागृहात दिली. या परिस्थितीचा थेट परिणाम महापालिकेच्या महसुलावर आणि परिणामी नागरी सुविधा व विकासकामांवर होत असल्याचे आयुक्तांनी म्हटले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात एकूण ३ लाख ५८ हजार मालमत्ताधारक असून त्यापैकी तब्बल १ लाख ७२ हजार मालमत्ताधारकांनी वर्षानुवर्षे मालमत्ता कर भरलेला नाही. महासभेत मांडण्यात आलेल्या कर दर निश्चितीच्या ठरावावर चर्चा करताना त्यांनी ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. इतक्या मोठ्या प्रमाणावर थकबाकी राहणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर मालमत्ता कर वसुलीचा प्रश्न येत्या काळात महापालिकेसमोर प्रमुख आव्हान म्हणून उभा राहणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असून, कर वसुलीसाठी महापालिका कठोर पावले उचलत असल्याचे आयुक्तांनी या माध्यमातून स्पष्ट केले आहे.


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/


# प्रशासकीय राजवटीचा अंत

16 जानेवारी 2026 च्या सार्वत्रिक महापालिका निवडणुकीनंतर निवडणुकीत निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या सत्ता संपादना काळापूर्वीच्या गत पाच वर्षात पुढील प्रशासकीय राजवटीच्या अंत झाला आहे. या कालावधीत सहा प्रशासकांनी ही धुरा वाहिली आहे. 2020 च्या नोव्हेंबर पासून ही प्रशासकीय राजवट होती आताही प्रशासकच पुन्हा आयुक्त पदभूषित आहेत. सत्तारूढ सरकारच्या राजकीय विचारांना न्याय देण्यात आघाडीवर प्रशासक होते. त्या प्रवृत्तीमुळे न्यायालयाने एका प्रशासकालाच न्यायालयात प्राचारण करून कार्यप्रणाली बाबत धारेवर धरलेहोते. . प्रशासकीय राजवटीमध्ये प्रशासकांनी 842 ठरवणारे हा किल्ला लढविला होता. ठराव पाहता आरक्षित पन्नास भूखंडाची आरक्षणे बदलणे, परवानगी विना वन व शासकीय जमिनीवरील आरक्षित आरक्षणाबाबत स्वतःच निर्णय घेणे, चार लेखाशीच्या ती निधी खच्ची न झाल्याने अन्य लेखा क्षेत्रात समायोजित करणे, लोकप्रतिनिधींनी मंजूर केलेल्या 2019 वी च्या अर्थसंकल्पात मनमानी करून फेरफार करून घेणे, शहरी गरीब जनतेला बी एस युपी अंतर्गत घरे योजना बंद असूनही अपचन ठरलेल्या घटकांना सत्तारूढ पक्षाच्या दबावामुळे पाचट ठरवून घरे वाटप करणे, करोडो रुपये खर्च करून नेटवली परिसरातील महापौर बंगल्याच्या व्यवस्थापने बाबत दुर्लक्ष करणे, खाजगी जमीन मालकाच्या जमिनीवर बीएसयुपी प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेऊन त्यावर प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी न्यायालयाने केलेल्या दंडात्मक वाढीव खर्चाला सामोरे जाणे, आरक्षित भूखंड खाजगी व्यक्ती तसेच संस्था यांना अल्प दराने विक्री करणे किंवा देणे, भाषिक संस्था वारकरी संस्था खाजगी प्रशिक्षण केंद्रे उभारणीला वाव देणे, परिवहन तसेच शिक्षण संस्थेचे नऊ राखीव भूखंडांमध्ये फेरफार करणे, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणात वाढ होणे, त्यांच्या विभागीय चौकशीतील निर्णयानुसार पुन्हा त्यांना सेवेत समाविष्ट करणे, हिरव्या पावसाची एमआयडीसीमध्ये झळ बसणे, आदिवासी व दलित वस्तीच्या निधीतून करावयाच्या विकासावर नियंत्रण नसणे, वाढती थकबाकी नियंत्रित करण्यात दिरंगाई करणे भांडवली मूल्यावर कर आकारणी पुनर्प्रस्तावाला गती न देणे, खुल्या जागांचा वापर व्यापारी तत्वावर करण्यास मान्यता देणे, लोढा मायक्रोटेक डेव्हलपर्स प्रकल्पग्रस्तांना प्रकल्प होईपर्यंत 66 टक्के मालमत्ता करत सवलत देणे, पंतप्रधान इलेक्ट्रिक 100 बसेसच्यासाठी प्रयत्न च यश न येणे, स्मार्ट सिटी अंतर्गत मंजूर 21 पैकी नऊ प्रकल्पांना न्याय देणे, पावसाळ्यामध्ये अशा प्रकल्पासाठीचा भराव वाहून गेला तरी ठेकेदारांनी विरोधात कारवाई न करणे, त्यासाठी करोडो रुपयांच्या भांडवलाचा खर्च स्व भांडवलातून करणे, मालमत्तांचे मूल्य निर्धारण करण्यास दिरंगाई करणे, भूखंड विक्रीतून अडीचशे कोटी निधी उभारण्याच्या उद्दिष्टाला न्याय न देणे, ,, ११०० पेक्षा जास्त वृक्षांची कत्तल करण्यास परवानगी देणे, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले गेले असता ही विकास डोळ्यात बनण्यासारखा न होणे, मनमानी पद्धतीने विकासकांशी केलेले करार व त्यातून झालेले नुकसान याबाबत दुर्लक्ष करणे, आर्थिक परिस्थिती नाजूक असता नवीन कामे न घेण्याच्या निर्णयाला छेद देणे अशा अनेक बाबींबाबत प्रशासकीय राजवटीत फारशी प्रगती दिसली नाही.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न




ADMISSION OPEN
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
7038658191
9130580111



ठाणे ■ सोमवार
23 फेब्रुवारी 2026
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता




# टिटवाळा : गॅस डिलिव्हरी कर्मचाऱ्यावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** टिटवाळ्यात इंदिरानगर परिसरात गॅस सिलेंडर वेळेत न दिल्याच्या कारणावरून डिलिव्हरी कर्मचाऱ्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारी रात्री सुमारे आठच्या सुमारास ही थरारक घटना घडली. महेंद्र शेजूळ (वय ४०), इंदिरानगर येथील रहिवासी, हे नेहमीप्रमाणे सिलेंडर वितरणाचे काम आटोपून वाहन उभे करत असताना आरोपी अर्जुन शर्मा (वय २५) याने त्यांना अडवून जाब विचारला. सिलेंडर उशिरा मिळाल्याचा राग मनात साचून राहिल्याने त्याने शाब्दिक वाद सुरू केला. काही क्षणांतच हा वाद उग्र झाला आणि संतापाच्या भरात आरोपीने जवळील कोयता काढून शेजूळ यांच्यावर वार केले. या हल्ल्यात आरोपीच्या दोन साथीदारांनीही सहभाग घेतल्याची माहिती पुढे आली आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या शेजूळ यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले असून कल्याण तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब आणि तांत्रिक पुरावे यांच्या आधारे तपासाची गती वाढवली आहे. आरोपींना लवकरच अटक केली जाईल, असा विश्वास पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# जलवाहिनीसाठी खोदलेल्या खड्डयात पडून दुचाकीस्वार जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा गलथान कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. कल्याण पूर्वेतील पुणे लिंक रोड वरील हॉटेल प्रसाद समोरील रस्त्यावर जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्डयात दुचाकीस्वार युवक वाहनासह खड्डयात पडून गंभीर जखमी झाला आहे. महापालिकेचा हा निष्काळजीपणा नागरीकांच्या जिवावर उठला आहे. या रस्त्यावर डंपरचा दुचाकीस्वाराला धक्का लागल्याने दुचाकीस्वार दुचाकीसह खड्डयात पडला. हि घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून या घटनेत दुचाकीस्वार जखमी झाला असून दुचाकीचे नुकसान झाले आहे. संपूर्ण केडीएमसी क्षेत्रात खोदकामे चालु आहेत, हि विकासकामे होत असतांना नागरीकांच्या सुरक्षेकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे. या ठिकाणी पायी चालणाऱ्या नागरीकांचा फुटपाथ सुद्धा उखडून टाकण्यात आला असल्याने नागरिकांना चालणे देखील अवघड झाले आहे. हे काम गेल्या दिड महिन्याहून अधिक काळ या ठिकाणी चालु आहे. एकदा टाकलेले पाईप परत काढून पुन्हा टाकले आहेत. भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून आता तरी प्रशासनाने योग्य ती उपाय योजना करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# डोंबिवलीत लिटिल चॅम्प शाळेचा स्नेहसंमेलन सोहळा जल्लोषात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
● कुणाल म्हात्रे




**कल्याण :** धर्मवीर आनंद दिघे हॉल, गांधीनगर डोंबिवली येथे अभिमान शिक्षण संस्था, लिटिल चॅम्प या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा नुकताच अत्यंत उत्साहपूर्ण व जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा जिल्हा अध्यक्ष नंदू परब, उपमहापौर राहुल दामले, भाजपा गटनेते शशिकांत कांबळे, नगरसेवक महेश पाटील, पेंढारकर कॉलेज व्हाइस प्रेसिडेंट प्रा. धनंजय पगारे, मुंबई युनिव्हर्सिटी डॉ. रामराजे यांची उपस्थिती लाभली. तसेच संस्थेचे अध्यक्ष अशोक पगारे, संचालक मंडळ सदस्य अविनाश पगारे, अजिंक्य पगारे, वंदना पगारे, मुख्याध्यापिका वैशाली महाजन, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने, भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्री मातेच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर मुख्याध्यापकांनी प्रास्ताविकातून शाळेच्या वार्षिक प्रगतीचा सविस्तर आढावा सादर केला. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांत शाळेने केलेली उल्लेखनीय कामगिरी त्यांनी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना ध्येय निश्चिती, कठोर परिश्रम आणि शिस्त यांचे महत्त्व पटवून दिले. “शिक्षण हीच खरी संपत्ती असून, त्याद्वारेच व्यक्तिमत्त्व विकास शक्य आहे,” असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच पालक व शिक्षकांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांचा उज्ज्वल भविष्यकाळ घडतो, असेही त्यांनी नमूद केले.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. पारंपरिक व पाश्चात्य नृत्य, देशभक्तीपर नाटिका, समूहगीत, लघुनाट्य, योगप्रदर्शन आदी कार्यक्रमांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन घडविणारा हा सोहळा सर्वांसाठी संस्मरणीय ठरला. कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक, क्रीडा, विज्ञान प्रदर्शन, कला स्पर्धा आणि इतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. एकंदरित, शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा आनंद, उत्साह आणि प्रेरणेचा अविस्मरणीय संगम ठरला.

# केडीएमसीची कचोरे येथील अनधिकृत बांधकामावर कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कचोरे परिसरात सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामावर कल्याण-डोंबिवली महानगरपालिका जे प्रभाग कार्यालयामार्फत कारवाई करण्यात आली. हे बांधकाम ठेकेदार यांच्या मार्फत करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. याबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर सहाय्यक आयुक्त सविता हिले यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित पथकाने स्थळावर जाऊन कारवाई केली. आणखी काही ठिकाणी सुद्धा कारवाई करण्यात येईल. कारवाईदरम्यान संबंधितांना पुढील काळात कोणतेही अनधिकृत बांधकाम केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 (MRTP Act) अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली. महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी आवश्यक परवानग्या व मंजूर नकाशा घेणे बंधनकारक आहे. अन्यथा नियमबाह्य बांधकामांवर प्रशासन कठोर कारवाई करेल.

# वाढत्या प्रदुषणामुळे दिल्ली व मुंबई प्रमाणेच भिवंडीतही व्हायरल फिवरच्या रुग्णांत वाढ



> भिवंडी महापालिका कार्यक्षेत्रात 8 लाखाहून अधिक लोकसंख्या आहे.शहर व ग्रामीण भागात 200 हुन अधिक सायजिंग व डाईंग कंपन्या आहेत. तसेच शहरात दिवस रात्र सुरू असलेल्या सायजिंग व कापडावर रंगाची प्रक्रिया करणाऱ्या डाईंग कंपन्यांमध्ये तयार होणारा कार्बन डायऑक्साईड हा विषारी वायू सोडण्यासाठी चिमण्या(धुरांडी) उभारण्यात आल्या आहेत. सरकारी नियमानुसार या चिमण्यांची उंची सर्वसाधारण 90 ते 120 फूट असणे आवश्यक आहे. परंतु, येथील चिमण्यांची उंची कमी उंची असल्याचे आढळून आले आहे. त्याचबरोबर कंपन्यांमध्ये असलेल्या बॉयलरमध्ये कोळसा टाकणे आवश्यक असताना काही डाईंग कंपन्या आर्थिक बचतीसाठी कोळशाऐवजी प्लास्टिक, फायबर, कपड्याच्या चिंध्या, भंगार जाळतात त्यामुळे प्रदुषणाचा वेग वाढत असल्याची माहिती येथील नागरिक देत आहेत. या सायजिंग व डाईंगच्या धुरातून काळे तंतू तयार होतात. हे तंतू या परिसरात राहणारी लहान-मोठ्या नागरिकांच्या नाकातोंडात जात असतात. अनेकदा धुरामुळे डोळे झोमने,खोकला,व सर्दी मुळे श्वास घ्यायला त्रास,अशा अनेक आजाराने नागरिक त्रस्त झाले आहेत.

**शहरातील वाढते प्रदूषण व धुळीमुळे बहुतांश नागरिकांना सर्दी खोकला व विविध आजार घडत आहे त्यामुळे नागरिकांनी तोंडावर मास्क व रुमाल बांधूनच प्रवास करावा महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अतिशय वेगाने वाढत आहे. त्यामुळे भिवंडी शहरातील रहिवासी शालेय विद्यार्थी,महिला व नागरिकांना सर्दी, खोकला व तापाचा अतोनात त्रास होण्यास सुरुवात झाली आहे. खोकल्यासह विविध आजाराचा सामना करावा लागत असल्याने महापालिका आरोग्य केंद्र,हॉस्पिटल व दवाखान्यांमध्ये उपचारासाठी गर्दी होत आहे.त्यामुळे महापालिकेचे नवनिर्वाचित महापौर नारायण चौधरी व आयुक्त अनमोल सागर यांनी लक्ष्य दयावे अशी मागणी होत आहे.**

गेल्या काही दिवसांपासून भिवंडी शहर परिसरात असलेले डाईंग व सायजिंगच्या चिमण्यांमधून निघणारा काळाकुट्ट धूर व शहरातील खराब झालेले रस्ते व रस्त्यावर पडलेल्या खड्डयातून निघणारी मातीची धूळ यामुळे भिवंडीकरांना शहरात पायी फिरणे कठीण झाले आहे.रस्त्यावरील सतत उडणाऱ्या मातीच्या धुळीमुळे शालेय विद्यार्थी, महिला व नागरिकांना श्वसनाचे आजार जडत आहेत.तसेच वाढत्या वायु प्रदूषणामुळे सर्दी,खोकला व तापासारखे विविध आजारांना नागरिक बळी पडत आहेत.याकडे राज्य शासनाचे प्रदुषण मंडळ व महापालिका आयुक्त प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.त्यामुळे महापालिका आयुक्त सागर व महापौर नारायण चौधरी व राज्य शासनाने यांनी गंभीर प्रश्नाकडे लक्ष द्यावे अशी मागणी सामाजिक संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी कडून होत आहे.

मनपा कर्मचारी व ठेकेदार अनेक ठिकाणी नियमित कचरा उचलत नसल्याने नागरिकांकडून कचरा जाळला जात आहे.त्यातून काळा धुर निघत असल्यान मोठ्या प्रमाणात प्रदूषण होतआहे.तर दुसरीकडे भिवंडी शहरातील खराब रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांमुळे अनेकांनी रस्त्यावर मातीचे ढिग निर्माण झाले आहेत त्या मातीची धूळ हवेमुळे व वाहनाचे भरधाव वेगाने चालत असल्याने धूळ उडून नागरिकांच्या घरामध्ये व पादचारी नागरिकांच्या नाका तोंडात जात असल्यामुळे त्यांना विविध आजार जडत आहे.सध्या सर्व रस्ते धुळीने व्यापलेले आहेत.त्यामुळे सर्व त्रस्त झाले आहेत.यावर पर्यायी उपाय म्हणून कित्येक महिला व नागरिकांनी तोंडावर रुमाल, स्कार्फ किंवा मास लावून फिरतात. परंतु, पालिका प्रशासनाला ही धूळ काही दिसत नाही.

# आभा परिवर्तनवादी संस्थेमार्फत पहिले मरणोत्तर अवयवदान यशस्वी

## सेवानिवृत्त बँक कर्मचाऱ्यांचा संकल्प कुटुंबियांनी पूर्ण केला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** वसई येथील रहिवासी व वसई विकास बँकेतील सेवानिवृत्त कर्मचारी साधना मधुकर वर्तक (वय ६६ वर्षे) यांनी आयुष्यभर जपलेला मरणोत्तर अवयवदानाचा संकल्प त्यांच्या निधनानंतर कुटुंबियांनी पूर्ण करत मानवतेचा अत्यंत प्रेरणादायी आदर्श घालून दिला आहे. आभा परिवर्तनवादी संस्था, मुंबई (संकल्प अवयव दानाचा) यांच्या माध्यमातून हे पहिले मरणोत्तर अवयवदान यशस्वीरीत्या संपन्न झाले.

वर्तक यांनी जिवंतपणी अवयवदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेचा मान राखत पती मधुकर वर्तक, मुलगी किमया पाटील, जावई लिकिन पाटील आणि भाऊ उमेश पाटील यांनी या कठीण प्रसंगीही धैर्य दाखवत अवयवदानास संमती दिली. कुटुंबियांनी रुग्ण मित्र राजेंद्र ढगे यांच्या मार्फत आभा संस्थेचे कार्यकर्ते सुमित वाडगावकर यांच्याशी संपर्क साधून आपली इच्छा व्यक्त केली. त्यानंतर संस्थेचे कार्यकर्ते सुमित वाडगावकर व वीणा सावंत यांनी रुग्णालयात जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. अवयवदानाबाबत उपस्थित झालेले सर्व प्रश्न, शंका आणि प्रक्रिया यांची सविस्तर माहिती देऊन कुटुंबियांचे समाधान केले. यानंतर संबंधित प्रकरणाची माहिती झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटर, मुंबई येथील प्रशासकीय अधिकारी उर्मिला यांना देण्यात आली. आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून, वर्तक यांच्या इच्छेनुसार आणि कुटुंबाच्या संमतीने दिनांक १८ फेब्रुवारी रोजी त्यांच्या दोन्ही किडनी, हृदय व यकृत यांचे अवयवदान यशस्वीरीत्या पार पडले. या अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. दु:खाच्या प्रसंगीही समाजहिताचा विचार करून घेतलेला हा निर्णय इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

आभा परिवर्तनवादी संस्था यांनी या प्रसंगी कुटुंबियांचे विशेष आभार मानत, समाजात अवयवदानाबाबत जागरूकता वाढविण्याचे आवाहन केले आहे. संस्था मागील काही वर्षापासून अवयवदान जागृतीचे काम करीत आहे. वर्तक कुटुंबियांच्या मुळे या कामातील कार्यकर्त्यांच्या आत्मविश्वास द्विगुतीत झाला आहे असे मत संस्थेचे अध्यक्ष राजेश मोरे यांनी व्यक्त केले. “अवयवदान म्हणजे जीवनदान” — या उदात्त भावनेचा संदेश साधना वर्तक यांच्या कार्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.



# 'आयसीएआय'च्या कल्याण डोंबिवली शाखा अध्यक्षपदी सीए अमित मोहरे यांची निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या कल्याण-डोंबिवली शाखेच्या वर्ष २०२६-२७ या वर्षासाठीच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. शाखेच्या अध्यक्षपदी डोंबिवलीकर आणि सीए अमित मोहरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष अमित मोहरे, उपाध्यक्ष प्रदीप मेहता, सचिव अमृता जोशी, कोषाध्यक्ष ईश्वर रोहरा, विकासा अध्यक्ष रोहन पाठक, माजी अध्यक्ष राकेश अग्रवाल, कार्यकारिणी सदस्य गिरीश तारवानी, अनुराग गुप्ता आणि विपुल शाह यांचा समावेश आहे. कल्याण-डोंबिवली शाखेचे कार्यक्षेत्र अतिशय मोठे असून यामध्ये कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर, तसेच कर्जत आणि कसारा या भागांचा समावेश होतो. सध्या या शाखेशी ४ हजार ८०० हून अधिक सीए सभासद आणि १३ हजार हून अधिक विद्यार्थी जोडले गेले आहेत. सध्या ही शाखा ५ अभ्यासिका आणि २ आयटी प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून भाड्याच्या जागेतून कार्यरत आहे. मात्र, सभासद आणि विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सहकार्याने लवकरच संस्थेची स्वतःची सुसज्ज इमारत उभी राहणार आहे, अशी माहिती नवनिर्वाचित अध्यक्ष सीए अमित मोहरे यांनी दिली. व्यावसायिक पारदर्शकता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि सामाजिक बांधिलकी जपत ही शाखा येणाऱ्या काळात उल्लेखनीय कार्य करेल, असा विश्वास नवनिर्वाचित कार्यकारिणीने व्यक्त केला आहे.

# पालघरमध्ये सामाजिक उपक्रमांना चालना

## स्वयंसेवी संस्था, युवक व महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी / दि. २२

**पालघर :** पालघर जिल्ह्यात विविध स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे आणि महिला बचत गटांच्या पुढाकारातून सामाजिक उपक्रमांना लक्षणीय चालना मिळत आहे. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच गरजू घटकांना मदत या क्षेत्रांत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडताना दिसत आहेत. ग्रामीण व आदिवासी भागांत आरोग्य तपासणी शिबिरे, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, स्वच्छता मोहिमा आणि वृक्षारोपण कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येत आहेत. या उपक्रमांना स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून युवकांचा सहभाग विशेष उल्लेखनीय ठरत आहे. महिला बचत गटांच्या माध्यमातून स्वावलंबन, कौशल्य प्रशिक्षण आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास हातभार लागत असून कुटुंबांच्या जीवनमानात सुधारणा होत असल्याचे चित्र आहे. प्रशासन व सामाजिक संस्थांमधील समन्वयामुळे हे उपक्रम अधिक प्रभावी ठरत असून, भविष्यातही अशाच प्रकारे सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

# ठाणे–घोडबंदर मार्गावर वाहतूक कोंडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ● प्रतिनिधी / दि. २२

**भाईंदर :** ठाणे–घोडबंदर मार्गावर अचानक वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली. या कोंडीमुळे वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या असून प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. येथील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी अवजड वाहनांवर वेळेचे निर्बंध घातले आहेत. त्यामुळे काही प्रमाणात वाहतूक कोंडी कमी झाली होती. मात्र घाट मार्ग अरुंद असल्याने तो वाहतुकीस अपुरा ठरत आहे. रविवारी घोडबंदरहून वर्सोव्याकडे जाणारा घाट मार्ग जाम झाला. यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. बस व रिक्षांमधील प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. अवजड वाहन अचानक बंद पडल्याने कोंडी झाल्याचा आरोप प्रवाशांनी केला. घटनास्थळी वाहतूक पोलीस दाखल झाले. कोंडी सोडवण्यासाठी काम सुरू आहे. ठाण्याहून येणारा मार्ग पूर्णतः जाम झाल्याचे चित्र आहे. प्रवाशांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024